**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी शिक्षण अत्यावश्यक असून, संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन, राज्यातले ६ शिक्षक राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित

- युक्रेनमध्ये कोणत्याही पाश्चिमात्त्य देशानं सैन्य तैनात केलं तर युक्रेनवर थेट लष्करी कारवाई करण्याचा रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा इशारा

- मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांचा शपथविधी

**आणि**

- महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताचा थायलंडवर ११-० नं विजय, पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत उद्या भारताचा चीनशी मुकाबला

**<><><><><>**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच, शिक्षण हे व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी अत्यावश्यक असून, संवेदनशील शिक्षक, या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. शिक्षक दिनाच्या निमित्तानं, नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात झालेल्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. मुलींच्या शिक्षणातली गुंतवणूक ही कुटुंब, समाज आणि देशाच्या उभारणीत अनन्यसाधारण भूमिका बजावते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आधुनिक भारताच्या उभारणीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना त्या म्हणाल्या,

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (१३ सेकंद)***

यावेळी राष्ट्रपतींनी देशातल्या ६६ शिक्षकांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या ६ शिक्षकांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यातल्या अर्धापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि विज्ञान विषयाचे शिक्षक डा ॅ.शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदउद्दीन, लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाचे संगीत विषयाचे प्राध्यापक डॉ. सांदिपान जगदाळे, तसंच मुंबईतल्या अणुउर्जा केंद्रीय विद्यालयातल्या सोनिया कपूर यांनाही राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण संस्थांमधे बारामतीचे पुरुषोत्तम पवार आणि मुंबईच्या डा ॅ. नीलाक्षी सुभाष जैन, तर, कौशल्य विकास क्षेत्रात नागपूरच्या संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अनिल रामदास जिभकाटे हेही राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. व्यक्तीमत्वांची जडणघडण करण्यासाठीचा शिक्षकांचा समर्पण भाव म्हणजे अधिक मजबूत आणि उज्ज्वल भविष्याचा पाया असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

युक्रेनमध्ये जर कोणत्याही पाश्चिमात्त्य देशानं सैन्य तैनात केलं तर रशिया युक्रेनवर थेट लष्करी कारवाई करेल असा स्पष्ट इशारा, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी दिला आहे. ते, व्लाडिवोस्टोक येथे झालेल्या आर्थिक परिषदेत बोलत होते. २६ देशांनी युद्धोत्तर काळात युक्रेनला सुरक्षा हमी देण्याचं आश्वासन दिलं आहे. युद्धानंतर युक्रेनमध्ये सैन्य पाठवण्याची तयारी, फ्रान्स आणि ब्रिटन यांनी दर्शवली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मात्र अमेरिकेचं सैन्य युक्रेनमध्ये पाठवणार नसल्याचं सांगितलं आहे. या पार्श्वभूमीवर, पुतिन यांनी हा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं कर सुसूत्रीकरणाला मंजुरी दिल्याबद्दल, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. सामान्य नागरिक, शेतकरी, मध्यमवर्गीय, तसंच लहान उद्योजक आणि व्यापाऱ्यांना  या निर्णयामुळे फायदा होईल,  असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. जीएसटी कर पुनर्रचनेत, अन्नपदार्थांवरच्या करात झालेल्या बदलांची थोडक्यात माहिती ऐकूया…

**होल्ड- व्हॉईस कास्ट - तुषार पवार**

*जीएसटी करांच्या पुनर्चरनेमुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आला आहे तसंच अनेक गरजेच्या वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं त्या स्वस्त होतील. दूध आणि दुधाच्या प्रक्रीयाकृत पदार्थांवरचा  १२टक्के  आता ५ टक्के झाला आहे. पॅकबंद पनीरवर पूर्वी १२ टक्के जीएसटी होता तो आता पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. बाटलीबंद पाण्याच्या २० लीटरच्या कॅनवरचा कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे.  याखेरीज सुकामेवा, आईसक्रीम, साखरेपासून बनलेल्या मिठाया ऐन सणासुदीला  स्वस्त होतील. पॅकबंद फरसाण आणि इतर तयार खाद्यपदार्थांवरचा करही कमी करुन ५ टक्क्यांवर आला आहे. पोळी, चपाती, पराठा, खाखरा अशा खास भारतीय ब्रेडसदृश पदार्थांवर आता शून्य कर असेल. साखरेत मुरवलेल्या भाज्या, फळं, मश्रूम्स, त्यांचे जॅम, जेली आणि प्युरी यांच्यावर ५ टक्के कर असेल. मात्र आरोग्याला प्रतिकूल असलेली शीतपेयं, फळांचे रस , साखर किंवा इतर मधुरकं वापरलेली पेयं यांच्यावरचा कर २८ टक्क्यांवरुन ४० टक्के करण्यात आला आहे.  ऐकूया यावर एका गृहिणीची प्रातिनिधिक प्रतिक्रीया.....*

**होल्ड- स्नेहल काशीद**

*(ऐन सणासुदीच्या तोंडावर मिठाई, फरसाण असे पदार्थ स्वस्त झाले तर पाहुण्यांचं तोंड गोड करता येईल. भाज्या, फळं, डाळींचे सांडगे तर सर्वांनाच लागतात. तसंच*

*कोल्डड्रिंक महाग झाले तर कमी प्यायले जाईल. हा परिणाम चांगलाच म्हटला पाहिजे.*

**<><><><><>**

न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. मुंबईत राजभवनात झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्यायमूर्ती चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मंत्री, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून काम करत होते. यापूर्वी त्यांनी झारखंड उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणूनही काम पाहिलं आहे.

**<><><><><>**

महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतानं थायलंडचा ११ - ० असा पराभव करत या स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. या स्पर्धेत भारताचा उद्या जपान संघासोबत सामना होणार आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये राजगीर इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत उद्या भारताचा सामना चीनशी होणार आहे. हा सुपर फोर फेरीतला सामना उद्या संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल. या स्पर्धेत काल भारतानं मलेशियाचा ४-१ असा पराभव केला. आतापर्यंत अपराजित राहिलेला भारत सुपर फोर फेरीच्या गुणतालिकेत चार गुणांसह अव्वल स्थानावर आहे. मलेशिया आणि चीन प्रत्येकी तीन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत.

**<><><><><>**

ईद मिलाद उन नबी अर्थात प्रेषित महंमद यांचा जन्मदिवस आज साजरा होत आहे. हिजरी कालगणनेनुसार प्रेषित महंमदांची ही पंधराशेवी जयंती असल्यामुळे यावर्षी या सणाला आणखी महत्त्व आहे. ठिकठिकाणी मिलाद मैफिली आणि सीरत परिषदांचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच मिरवणुका काढण्यात येत आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिलाद-उन-नबीच्या निमित्तानं शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद यांनी मानवता, एकता आणि सेवेचा संदेश दिला असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.
तर प्रधानमंत्र्यांनी, हा सण समाजात शांती आणि कल्याण घेऊन येवो, अशी आशा व्यक्त केली आहे.

<><><><><>

उद्याच्या गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई पुण्यासह ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनानं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून अनेक ठिकाणी मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. वाहतुकीचं नियमन करण्यात येत असून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

<><><><><>

सुधारीत वस्तू-सेवा कर प्रणाली मुळे लोक जास्त खरेदी करतील, मात्र सरकारी भांडवली खर्चावर याचा नकारात्मक परिणाम होणार नाही, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.  आता ९९ टक्के वस्तू आणि सेवा, शून्य-पाच किंवा १८ टक्के जीएसटी दराच्या कक्षेत आल्या आहेत, असं त्यांनी एका खासगी दूरचित्र वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. पेट्रोलियम आणि मद्य उत्पादनं जीएसटी कक्षेबाहेर राहतील, असं त्या म्हणाल्या.

अमेरिकेच्या ५० टक्के आयातशुल्कं धोरणाचा परिणाम झालेल्या निर्यातदारांना मदत करण्यासाठी, सरकार उपाययोजना करत आहे. निर्यातदारांसाठी पॅकेज तयार केलं जात आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

ताग उद्योगात नवकल्पना आणि तंत्रज्ञानातील बदल आवश्यक असल्यावर केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांनी भर दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये आज कोलकाता इथे इंडियन जूट इंडस्ट्रीज रिसर्च असोसिएशनच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी ताग उद्योगाचं भारतीय अर्थव्यवस्थेतलं महत्त्व अधोरेखित केलं. तागाच्या तंतूंचं इतर संबंधित तंतूंसह मिश्रण केल्यास या क्षेत्रातली निर्यात खूप वाढवता येऊ शकते आणि नवीन पिढीच्या फॅशनला चालना देता येईल, असही ते म्हणाले.

**<><><><><>**

जपान मध्ये टोकियो इथे झालेल्या दोन्ही बाजूंच्या दोन-दोन नेत्यांच्या द्विपक्षीय चर्चेदरम्यान जपान आणि ऑस्ट्रेलियानं, संरक्षण उपकरणं आणि सायबर क्षेत्रासह विविध क्षेत्रांत आपले सुरक्षा संबंध व्यापक करण्याचा निर्णय घेतला आहे. चर्चेनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत जपानचे परराष्ट्र मंत्री ताकेशी इवाया यांनी सांगितले की, दोन्ही देश, क्षेत्रीय सुरक्षा वातावरण अधिक गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आपली संयुक्त प्रतिकार क्षमता मजबूत करणार आहेत.

**//<><><><><>//**